परभणी पंचायत समिती (जि.परभणी) येथील अधिकारी व कर्मचारी यांच्या निवासस्थान इमारत बांधकामास प्रशासकीय मान्यता देणेबाबत...

महाराष्ट्र शासन

ग्राम विकास विभाग

शासन निर्णय क्रमांकः जिपई-२०१८/प्र.क्र.१५१/बांधकाम-४

पाचवा मजला, मर्झबान पथ, २५ बांधकाम भवन,
फोर्ट, मंत्रालय, मुंबई- ४०० ००१
तारीख : ०५ सप्टेंबर, २०१९

वाचा:-

१. **अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, परभणी यांचे पत्र क्रमांकः** जिप बांध/कावि/तां.शा-१/३४४८/२०१८, दिनांक ३१ जुलै, २०१७.
२. **कार्यकारी अभियंता (बांध), जिल्हा परिषद, परभणी यांचे पत्र क्रमांकः** बांध ४५१०/१८ दिनांक ३१ ऑक्टोबर, २०१८.

प्रस्तावना:-

अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, परभणी यांनी उपरोक्त वाचा मधील पत्रान्वये परभणी पंचायत समिती, जिल्हा परभणी येथे पंचायत समितीच्या अधिकारी व कर्मचारी निवासस्थान इमारत बांधकामाचा प्रस्ताव सादर केला आहे. सदर प्रस्तावानुसार एकूण २८ निवासस्थाने वॉर्ड क्र.१ स.न./गट नं. १५१७९ मध्ये एकूण ४०८७ चौ.मी. या जागेवर बांधण्याचे प्रस्तावित आहे. त्यामुळे पंचायत समिती परभणी यांच्या मागणी व गरजेनुसार टाईप II प्रकारातील २४ व टाईप III प्रकारातील ४ निवासस्थानांच्या बांधकामाचा प्रस्ताव सादर केला आहे.

०२. अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद परभणी यांनी परभणी निवासस्थान बांधकामाकरीता उप मुख्य वास्तुशास्त्रज्ञ, सा.बां. वि., नागपूर यांच्या कडील नमुना नकाशा टाईप- II व III जॉब क्र. टी-डीएएन/आरईएस-१९ व २० उपयोगात आणला आहे. यासाठी सन २०१७-१८ च्या दरसूचीवर आधारीत एकूण रू. ४९९.९६ लक्ष किंमतीचे अंदाजपत्रक सादर केले आहे. सदरील अंदाजपत्रक उप अभियंता व कार्यकारी अभियंता (बांध.), जिल्हा परिषद, परभणी यांनी साक्षांकीत केले आहे. प्रस्तावासोबत नमुना नकाशा, सविस्तर अंदाजपत्रक, जागेचा ले-आऊट प्लॅन, पंचायत समितीचा ठराव, टाईप प्लॅन इ. कागदपत्रे सादर केली आहेत.

०३. अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, परभणी यांनी सादर केलेल्या प्रस्तावाच्या छाननी अंती, परभणी पंचायत समिती येथील पंचायत समितीच्या अधिकारी व कर्मचारी निवासस्थान इमारत बांधकामाच्या टाईप II प्रकारातील २४ व टाईप III प्रकारातील ४ निवासस्थानांच्या बांधकामाचा प्रस्ताव, अशा एकूण २८ निवासस्थान बांधकामाच्या एकूण

रू.४,९९,९६,०००/- इतक्या अंदाजपत्रकीय किंमतीच्या बांधकामास प्रशासकीय मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णयः-

परभणी, जिल्हा परभणी येथील पंचायत समितीच्या अधिकारी व कर्मचारी निवासस्थान इमारत बांधकामाच्या टाईप ॥ प्रकारातील २४ व टाईप ॥। प्रकारातील ४ निवासस्थाने, अशा एकूण २८ निवासस्थानांच्या बांधकामाच्या एकूण ४,९९,९६,०००/- (रूपये चार कोटी नव्याण्णव लक्ष शहाण्णव हजार फक्त) इतक्या अंदाजपत्रकीय किंमतीच्या बांधकामास पुढील अटी व शर्तींच्या अधीन राहून, या शासन निर्णयान्वये प्रशासकीय मान्यता देण्यात येत आहे.

१. परभणी, जिल्हा परभणी येथील पंचायत समितीच्या अधिकारी व कर्मचारी निवासस्थान इमारत बांधकामाच्या टाईप-॥ प्रकारातील २४ व टाईप-॥। प्रकारातील ४ निवासस्थानांच्या इमारतींचे बांधकाम ज्या जागेवर करावयाचे आहे, ती जागा प्रथमत: जिल्हा परिषद/पंचायत समितीच्या स्वत:च्या नावावर करून घेणे बंधनकारक राहील.
२. नियोजित निवासस्थान इमारतीचे बांधकाम जुनी इमारत पाडून करावयाचे असल्यास, बांधकाम सुरू करण्यापुर्वी संबंधित अधीक्षक अभियंता, सा.बां. मंडळ, प्रादेशिक विभाग यांच्याकडून प्रथमत: अस्तित्वातील जुन्या इमारतीचे स्ट्रक्चरल ऑडीट करून घेण्यात यावे, त्यानुसार अस्तित्वातील इमारत वापरण्यास अयोग्य असावी.
३. परभणी, जिल्हा परभणी येथील पंचायत समितीच्या अधिकारी व कर्मचारी निवासस्थान इमारत बांधकामाच्या टाईप-॥ प्रकारातील २४ व टाईप-॥। प्रकारातील ४ बांधकामाकरीता, प्रस्तावित करण्यात आलेल्या आराखड्यास बांधकाम सुरू करण्यापुर्वी प्रथमत: मुख्य वास्तुशास्त्रज्ञ/प्रादेशिक उप मुख्य वास्तुशास्त्रज्ञ यांची मान्यता घेणे तसेच अग्निशमन यंत्रणेची मंजूरी घेणे आवश्यक राहील.
४. विहीत नमुना आराखड्यानुसार कामे हाती घेताना, स्थानिक नगररचना प्राधिकरणाची मंजुरी घेणे बंधनकारक राहील.
५. या कामाच्या सविस्तर अंदाजपत्रकास प्रथमत: सक्षम प्राधिकाऱ्याकडून त्वरेने तांत्रिक मान्यता घेणे बंधनकारक राहील.
६. प्रस्तुत निवासी इमारत बांधकामामध्ये ग्रीन बिल्डींग संकल्पना अंमलात आणून, नैसर्गिक प्रकाशयोजना व वायुवीजन, पाण्याच्या व उर्जेच्या वापरात काटकसर, पर्जन्य जलपुन:र्भरण आणि जास्तीत जास्त पर्यावरणपूरक बांधकाम साहित्य व साधन-सामुग्रीचा वापर करणे आवश्यक राहील.
७. प्रत्यक्ष बांधकाम करतेवेळी पर्यावरण विभाग, शासन निर्णय क्र. इएनव्ही-२०१३/ प्र.क्र.१७७/तां.क.१, दिनांक १० जानेवारी, २०१४ मध्ये उल्लेख करण्यात आलेल्या मार्गदर्शक तत्वानुसार कार्यवाही करण्यात यावी.
८. प्रस्तुतचे काम हाती घेतल्यापासून जास्तीत जास्त दोन वर्षात पूर्ण होईल, असे नियोजन करुन, इमारत बांधकामाचा त्रैमासिक प्रगती अहवाल वेळीच शासनास पाठविण्याची संबंधित कार्यकारी अभियंता (बांध.), जिल्हा परिषद यांनी दक्षता घ्यावी.

९. या प्रकरणी सुधारीत प्रशासकीय मान्यता दिली जाणार नसल्याने, मंजूर प्रशासकीय मान्यता किंमतीतच काम पूर्ण करण्याची संबंधित कार्यकारी अभियंता (बांध.), जिल्हा परिषद यांनी दक्षता घ्यावी. या कामावर प्रशासकीय मान्यतेपेक्षा अधिक खर्च झाल्यास तो सबंधित पंचायत समिती/जिल्हा परिषदेने सोसावा.

०२. परभणी, जिल्हा परभणी येथील पंचायत समितीच्या निवासी इमारत बांधकामाच्या अंदाजपत्रकाचा सर्वसाधारण गोषवारा पुढीलप्रमाणे आहे:-

General Abstract for Construction of Government Quarters at P. S. Parbhani, District Parbhani		
Sr. No.	Description of item	Amount (in Rs)
1	COST OF Type II Quarters 24 Nos (G +1-3 Buildings)	30196477.00
2	COST OF Type III Quarters 4 Nos (G +1-1 Buildings)	6830702.00
3	Total COST OF Type II + Type lll	37027179.00
4	Add 12 % for GST	4443261.00
5	**Total COST OF Construction**	**41470440.00**
	Electricfication & Other	
6	Internal (5% on cost of building proper)	1851359.00
7	Internal (6% on cost of building proper)	2221631.00
8	Water Supply Connection Charges	200000.00
9	Compound Wall & gate L/S	1500000.00
10	Internal Concrete Road L/S & Paver Block	682000.00
11	Parking Arrangement	500000.00
12	Rain Water Harvesting	50000.00
13	Fire Fighting Arrangement	50000.00
14	**Total A (5 to 13)**	**48525430.00**
15	Add 2% For Contingencies	970509
16	**Total B (14 to 15)**	49495939.00
	Option Items	
17	Water main, Storage & Pump house, Borewell etc.	200000.00
18	Dismentling	300000.00
	Total C (17 to 18)	500000.00
	Total Cost of project (B+C)	49995939.00
	Says Rs.	**4,99,96,000/-**

०३. या कामाच्या सविस्तर अंदाजपत्रकास सक्षम प्राधिकाऱ्याकडून त्वरेने तांत्रिक मान्यता घेण्यात येवून त्याची प्रत शासनास सादर करावी.

०४. प्रस्तुत कामाची माहिती कंस्ट्रक्शन ट्रॅकर प्रणालीवर अद्ययावत करावी.

०५. उपरोक्त बांधकामासाठी संबधित सक्षम प्राधिकाऱ्याची तांत्रिक मान्यता प्राप्त झाल्यानंतर अनुदान स्वरुपात निधी उपलब्ध करुन दिला जाणार असून, तो उपलब्धतेनुसार अर्थसंकल्प वितरण प्रणाली (BDS) द्वारे वितरीत करण्यांत येईल. या कामावरील खर्च "२५१५-इतर

ग्रामीण विकास कार्यक्रम १०१, पंचायती राज ३१ सहाय्यक अनुदाने (०१) (०५) जिल्हा परिषदांच्या निवासी इमारती बांधकामासाठी जिल्हा परिषदांना सहाय्यक अनुदाने- (२५१५ १२५६)" या लेखाशिर्षाखाली खर्ची टाकण्यात यावा.

०६. प्रस्तुतचा शासन निर्णय, वित्तीय अधिकार, नियम पुस्तिका, १९७८, भाग पहिला, उप विभाग-पाच, अनुक्रमांक १, महाराष्ट्र सार्वजनिक बांधकाम नियम पुस्तिकेतील परिच्छेद क्रमांक १३४ खाली, प्रशासनिक विभागास प्रदान करण्यात आलेल्या अधिकारास अनुसरून निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा सांकेतांक २०१९०९०३१७०८५२२६२० असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकीत करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

RAGHUNATH ANNASAHEB NAGARGOJE

Digitally signed by RAGHUNATH ANNASAHEB NAGARGOJE
DN: c=IN, st=Maharashtra, 2.5.4.20=decff3a81eacee2237c8c2d29460e7c459d9f7baaab677f7578d952747d49ab2, postalCode=400001, street=RURAL DEVELOPMENT DEPT,BANDHKAM BHAVAN,25MARZBAN ROAD,FORT,MUMBAI, serialNumber=d404eac17c41303f055a321c8b78aa06691d96f89d2b59532f46b0d468148ae1, ou=RURAL DEVELOPMENT DEPT, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, cn=RAGHUNATH ANNASAHEB NAGARGOJE
Date: 2019.09.05 11:12:47 +05'30'

(र. आ. नागरगोजे)
उप सचिव, महाराष्ट्र शासन.

प्रत,

१) मा.विरोधी पक्ष नेता, विधानसभा/ विधानपरिषद
२) विभागीय आयुक्त औरंगाबाद विभाग, औरंगाबाद
३) महालेखापाल, महाराष्ट्र -१ मुंबई / महाराष्ट्र -२ नागपूर
४) मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, परभणी
५) अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, परभणी
६) मुख्य लेखा व वित्त अधिकारी, जिल्हा परिषद, परभणी
७) कार्यकारी अभियंता (बांधकाम), जिल्हा परिषद, परभणी
८) जिल्हा कोषागार अधिकारी, जिल्हा परभणी
९) मुख्य लेखा परिक्षक, स्थानिक निधी लेखा, नवी मुंबई.
१०) उपमुख्य लेखा परिक्षक, स्थानिक निधी लेखा औरंगाबाद विभाग, औरंगाबाद
११) जिल्हा लेखा परिक्षक, स्थानिक निधी लेखा, परभणी
१२) सभापती, पंचायत समिती, परभणी, जिल्हा परभणी
१३) गट विकास अधिकारी, पंचायत समिती, परभणी, जिल्हा परभणी
१४) निवड नस्ती, कार्यासन बांधकाम-४, ग्राम विकास विभाग,मंत्रालय मुंबई.